मुंबई विद्यापीठ

क्र. घ.म./ ९ / २०१४–२०१५

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय, अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, शासन पत्र क्र. सहसं / उशि / कोविप / मशि–२/२०१४/५३० दिनांक ११/०४/२०१४ रोजी दिलेल्या आदेशातील अधोरेखीत मुद्यांचे अवलोकन करून सदर मुद्यांमध्ये नेट/सेट धारक उमेदवारांची उपलब्धता व ज्या महाविद्यालयामध्ये अर्हताधारक मान्यता प्राप्त नियमित स्वरूपाच्या शिक्षकांची भरती करण्यात आलेली नाही अशा महाविद्यालयाच्या संदर्भातील माहिती मा. उच्च न्यायालयास सादर करावयाची आहे. त्यामुळे या मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती संपूर्ण माहीती संचालक, उच्च शिक्षण कार्यालयास १५ दिवसांत सादर करण्याविषयी कळविण्यात आले आहे. तरी न्यायालयीन प्रकरणाचे महत्व लक्षात घेऊन अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयातील २०१० पासूनची मंजूर/कार्यरत व रिक्त पदांची माहिती व विहित निवड समिती मार्फत निवड न झालेल्या उमेदवारांची माहिती सहसंचालकांच्या पत्रातील विचारलेल्या मुद्दा क्र. २ व मुद्दा क्र ३ नुसार देण्यात यावी.

**मुद्दा क्र.२ : एकही अर्हताधारक नेमणूक न केलेल्या महाविद्यालयांची यादी**

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | शासन परवानगी आदेश क्र. व दिनांक | मंजूर नवीन महाविद्यालय विद्याशाखा / अभ्यासक्रम / अति. तुकडी/ विषय इत्यादीचे नाव | मान्य होणारी शिक्षक पदे प्राचार्य, ग्रंथपाल, मान्य होत असल्यास शारिरिक शिक्षक यांचेसह देण्यात यावी | एकही अर्हतधारक शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे अध्यापन कोणत्या अध्यापकाकडून करून घेतले जाते? |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

**मुद्दा क्र. ३ : आपल्या विभागात सेवेत नसलेले नेट/सेट धारक उमेदवार किती आहेत तसेच सेवेत नसलेले पीएच.डी. धारक किती आहेत?**

आपणांस विनंती करण्यात येते की वरिल माहिती देताना महाविद्यालयांत रिक्त पदे भरण्यासाठी अर्हताधारक नेट/सेट असणारे उमेदवार उपलब्ध होते का? आहेत का? तसेच पीएच.डी. धारक उमेदवार उपलब्ध होते का? आहेत का? याची सर्व माहिती देण्यात यावी. सदरची माहिती मा. न्यायालयास सादर करावयाची असल्याने प्राचार्यांनी वैयक्तिक लक्ष घालून तात्काळ माहिती **मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जिल्हा – रायगड – ४१० २०६,** येथे पाठवावी व केलेल्या कार्यवाहीची एक प्रत मुंबई विद्यापीठास पाठवावी.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– २० जून, २०१४

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय, अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क,महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे — ४११ ००१.
२. मा. सह—संचालक, मुंबई विभाग, महापालिका मार्ग, मुंबई — ४०० ००१.
३. मा. सह—संचालक, कोकण विभाग, पनवेल, जिल्हा — रायगड — ४१० २०६.
४. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
५. स्वीय सहाय्यक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
७. स्वीय सहायक, संचालक, बीसीयुडी, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
८. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ, मुंबई — ४०० ०९८.
९. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

26/6/15.

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ